RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार-अ

वर्ष १२, अंक २४(२)] गुरुवार, फेब्रुवारी १२, २०२६/माघ २३, शके १९४७ [पृष्ठे ४, किंमत : रुपये १५.००

असाधारण क्रमांक ९१

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

विधि व न्याय विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२,
दिनांक ११ फेब्रुवारी २०२६.

अधिसूचना

महाराष्ट्र दिवाणी न्यायालय अधिनियम.

क्रमांक न्यास्थाप-०८२५/प्र.क्र.१३४/कार्यासन-११.— महाराष्ट्र दिवाणी न्यायालय अधिनियम (१८६९ चा १४) याच्या कलम २१, २२अ व २३ यांद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा, आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, आणि त्याबाबतीत यापूर्वी काढलेल्या सर्व अधिसूचना, जेथवर त्या सातारा जिल्ह्यातील जिल्हा न्यायालय, सातारा यास दुय्यम असलेल्या दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, सातारा यांच्या न्यायालयाशी संबंधित असतील तेथवर, त्यांमध्ये अंशतः फेरबदल करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे असे निदेश देत आहे की, दिनांक १५ फेब्रुवारी, २०२६ पासून, -

(क) सातारा जिल्ह्यातील फलटण येथे जिल्हा न्यायालय, सातारा यास दुय्यम असलेले एक दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर असेल ;

(ख) दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर हे, उक्त न्यायालयाचे पीठासीन अधिकारी असतील आणि ते सातारा जिल्ह्यातील फलटण येथे त्यांचे न्यायालय भरवतील ; आणि

(ग) सातारा जिल्ह्यातील दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, फलटण यांच्या सर्वसाधारण अधिकारितेच्या स्थानिक सीमांमध्ये सातारा जिल्ह्यातील फलटण या महसुली तालुक्याच्या स्थानिक सीमांमध्ये समाविष्ट असलेल्या क्षेत्रांचा समावेश असेल आणि सदर क्षेत्रे, जी यापूर्वी दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, सातारा यांच्या सर्वसाधारण अधिकारितेच्या स्थानिक सीमांमध्ये समाविष्ट हाती ती उक्त क्षेत्रे त्यामधून वगळण्यात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

विलास वसंत गायकवाड,
शासनाचे विधि सल्लागार-नि - सह सचिव.

LAW AND JUDICIARY DEPARTMENT

Mantralaya,Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mumbai 400 032,

dated the 11th February 2026.

NOTIFICATION

MAHARASHTRA CIVIL COURTS ACT.

No. Nyasthap-0825/C.R.134/DESK-11.— In exercise of the powers conferred by sections 21, 22A and 23 of the Maharashtra Civil Courts Act (XIV of 1869), and of all other powers enabling it in this behalf, and in partial modification of all earlier notifications issued in that behalf, in so far as they relate to the Court of Civil Judge Senior Division, Satara in Satara District, subordinate to the District Court, Satara, the Government of Maharashtra, hereby directs that, with effect from 15th February, 2026,-

(*a*) there shall be a Civil Court at Phaltan, sub-ordinate to the District Court, Satara in Satara District ;

(*b*) the said Court shall be presided over by the Civil Judge (Senior Division) who shall hold his Court at Phaltan in Satara; and

(*c*) the local limits of the ordinary jurisdiction of the Civil Judge (Senior Division), Phaltan in Satara District shall comprise of the areas covered within the local limits of the revenue tehsil of Phaltan in Satara District and work from the said tehsil which was heretofore included within the local limits of the ordinary jurisdiction of the Civil Judge (Senior Division) Satara in Satara District shall be excluded therefrom.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

VILAS VASANT GAIKWAD,
Legal Advisor- *cum*- Joint Secretary to
Government.

विधि व न्याय विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२,

दिनांक ११ फेब्रुवारी,२०२६.

अधिसूचना

हिंदू विवाह अधिनियम, १९५५.

क्रमांक न्यास्थाप-०८२५/प्र.क्र.१३४/कार्यासन-११.— हिंदू विवाह अधिनियम, १९५५ (१९५५ चा २५) महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्याच्या कलम ३ च्या खंड (ब) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा, आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, आणि त्याबाबतीत, यापूर्वी काढलेल्या सर्व अधिसूचना, जेथवर त्या सातारा जिल्ह्यातील फलटण या महसुली तालुक्याशी संबंधित असतील तेथवर, त्यांमध्ये अंशतः फेरबदल करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, दिनांक १५ फेब्रुवारी, २०२६ पासून, महाराष्ट्र दिवाणी न्यायालय अधिनियम (१८६९ चा १४) या अन्वये स्थापन केलेल्या व अस्तित्वात असलेल्या दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, फलटण यांच्या न्यायालयाच्या सर्वसाधारण अधिकारितेच्या स्थानिक सीमांमध्ये, उक्त अधिनियमान्वये निर्णय करावयाच्या प्रकरणांच्या बाबतीत अधिकारिता असलेल्या सातारा जिल्ह्यातील दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, फलटण यांचे न्यायालय विनिर्दिष्ट करीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

विलास वसंत गायकवाड,
शासनाचे विधि सल्लागार-नि-सहसचिव.

LAW AND JUDICIARY DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mumbai 400 032,

dated the 11th February 2026.

NOTIFICATION

HINDU MARRIAGE ACT, 1955.

No. Nyasthap-0825/C.R.134/ DESK-11.— In exercise of the powers conferred by clause (*b*) of section 3 of the Hindu Marriage Act, 1955 (25 of 1955), in its application to the State of Maharashtra, and of all other powers enabling it in this behalf, and in partial modification of all the earlier notifications issued in that behalf, in so far as they relate to the revenue tehsil of Phaltan in Satara District, the Government of Maharashtra, hereby, with effect from 15th February, 2026, specifies, the Court of Civil Judge Senior Division at Phaltan, in Satara District, as having jurisdiction in respect of the matters to be dealt with under the said Act, within the local limits of ordinary jurisdiction of the existing Court of Civil Judge (Junior Division), Phaltan in Satara District, established under the Maharashtra Civil Courts Act (XIV of 1869).

By order and in the name of the Governor of Maharashtra,

VILAS VASANT GAIKWAD,
Legal Advisor- *cum*- Joint Secretary to
Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.